डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – **cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in**



जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २४८ /२०२६ दि.२७ /११/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि.२९/११/२०२६ सायकाळी १६:०० ते २३:०० वाजेपावेतो डॉ. श्रीकांत शिंदे फाउडेशंन आणि इव्हेंट फॅक्टरी प्रस्तुत **" द फोक आख्यान "** कार्यक्रम कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या नांदिवली रोडवर डी.एन.सी. शाळेचे मैदानात आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात श्री. डॉ. श्रीकांत एकनाथ शिदे, खासदार, श्री राजेश मोरे. आमदार कल्याण ग्रामीण व व्ही.व्ही.आय.पी. येणार असुन मोठया संख्येने प्रेक्षक सहभागी होणार असुन त्यामुळे सदरचा रस्ता अरूंद असल्याने वाहतुक कोंडी होउन नागरीकांना त्रास होऊ नये याकरीता नांदिवली रोडवरून एकतानगर, छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडुन दत्तनगर चौकाकडे येणारी व नेरूरकर रोडवरील दत्तनगर चौकाकडुन डी.एन.सी. शाळा मार्गे नांदीवली रोड कडे जाणारी वाहतुक अन्य मार्गाने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद–	**१)** नांदिवली रोडवरून डी एन सी रोडमार्गे दत्तनगर चौक व सुनिलनगर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौक/एकतानगर चौक/राजन मराठे कार्यालयाजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची सर्व वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक/एकतानगर चौक येथून उजवीकडे वळून संगीतावाडी, पांडुरंगवाडी अथवा सरळ भानुशाली हॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	**२)** नेरूरकर रोडवरील दत्तनगर चौकाकडुन डी.एन.सी. शाळा मार्गे नांदीवली रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लक्ष्मीकांत पाटील चौक/स्नेहांकित मित्र मंडळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची सर्व वाहने लक्ष्मीकांत पाटील चौक येथुन डावीकडे वळून भानुशाली मार्गाने, नांदीवली रोडने इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दिनांक २९/११/२०२६ रोजी सायंकाळी १६:०० ते रात्रौ २३:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर